**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र. : मुमाआ/नों.क्र.१७७६/२३/त.क्र.४०/२५/०१**

**श्री. नागेश कृ. कोयलकर** (तक्रारदार)
बि.नं. २३, रुम नं. ५, २रा मजला,
१० वा कामाठीपुरा, मुंबई – ४०००००८.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) ई विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त ई विभाग
यांचे कार्यालय, ३ रा मजला, १० शेख हफिजुद्दिन मार्ग,
भायखळा (प), मुंबई ४०० ००८.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ई विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त ई विभाग
यांचे कार्यालय, ३ रा मजला, १० शेख हफिजुद्दिन मार्ग,
भायखळा (प), मुंबई ४०० ००८.

| | |
|---|---|
| **तक्रारीचा दिनांक** | २१.०३.२०२५ |
| **सुनावणीचा दिनांक** | **१७.०२.२०२६** |
| तक्रारदार | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी दि. ०९.०६.२०२३ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाबाबत अपील क्र.मुमाआ/नों.क्र.२००७४९/२०/अ.क्र.५४७/२३/०१ नुसार "A) My application Dt-२०-०९-२०१९ give the certified copy of progress and status of this application (Attached the my application Dt-२०-०९-२०१९ for your ready information) C) If no action taken on this letter dt-२०-०९-२०१९ then give us the reason for the same. D) Name and address of next appeal authority. B) If any action taken on this letter dt-२०-०९-२०१९ then give me the certified acknowledgement copy for the same" याबाबत माहिती मागितली असून राज्य माहिती आयोगाने दि. ०९.०६.२०२३ रोजीच्या आदेशान्वये "जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत अपीलार्थी यांना वरील आदेशाप्रमाणे उपलब्ध माहिती किंवा उत्तर द्यावे". असे आदेश पारित केले आहे.

तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि. २१.०३.२०२५ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि. ०२.१२.२०१९ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अद्याप तक्रारदार यांना मिळालेली नसल्याचे सांगितले.

आज सुनावणीच्या वेळी तक्रारदार उपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहे.

या तक्रारसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) ई विभाग यांनी कार्यवाही केल्याचा कोणताही अभिलेख सादर केला नसून समाधानकारक उत्तर दिलेले नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) ई विभाग यांना असे आदेश देण्यात येत आहे की, तत्कालीन मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या आदेशानुसार अपीलार्थी यांना कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती तात्काळ व विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी.

तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) ई विभाग यांनी द्वितीय अपील आदेशाची अंमलबजावणी केली नाही. त्याबाबतचा समर्पक खुलासा सुध्दा आयोगास सादर केला नाही. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुध्द कलम २०(१) नुसार रुपये २५०००/- (रुपये पंचवीस हजार) इतका दंड का करु नये ? याबाबत खुलासा सादर करण्यास अंतिम संधी देण्यात येत आहे. सबब, याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, अन्यथा, अपिलार्थीस जाणुनबुजून माहिती दिली नाही, असे समजून दंडात्मक कारवाई कायम करण्यात येईल. या निर्देशासह सदर तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १७.०२.२०२६**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra